# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 16 October 2024
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १६ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. नायब राज्यपाल मनोज सिन्हा श्रीनगरमधल्या शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ओमर अब्दुल्ला आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला शपथ देणार आहेत. दहा वर्षांनंतर इथं झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स पक्षानं बहुमत मिळवलं आहे. कार्यक्रम सुरक्षित आणि निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी कार्यक्रमस्थळाभोवती कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केरळमधल्या वयानाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं प्रियंका गांधी यांना उमेदवादी जाहीर केली आहे. राहुल गांधी यांच्या राजीनाम्यामुळे ही जागा रिक्त झाली आहे.

****

दरम्यान, विधानसभेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसनं अखिल भारतीय काँग्रेस समितीचे वरिष्ठ निरीक्षक आणि वरिष्ठ निवडणूक समन्वयकांची नेमणूक केली आहे. मुंबई आणि कोकण विभागाचे निरीक्षक म्हणून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गहलोत आणि डॉ. जी. परमेश्वर काम पाहतील. मराठवाड्यात सचिन पायलट आणि उत्तम कुमार रेड्डी तर विदर्भासाठी भूपेश बघेल, चरणजीत सिंह चन्नी आणि उमंग सिंघर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रात टी. एस. सिंगदेव आणि एम. बी.पाटील, तर उत्तर महाराष्ट्रासाठी सईद नसीर हुसेन आणि डॉ. अनसुया सीताक्का यांच्याकडे निरीक्षकपदाची जबाबदारी देण्यात आल्याचं काँग्रेसनं पत्रकाद्वारे जाहीर केलं आहे.

****

मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत राज्यात आतापर्यंत चार लाखांपेक्षा जास्त लाभार्थ्यांच्या खात्यात एकशे तेवीस कोटी रुपये अनुदान वर्ग करण्यात आलं आहे. सामाजिक न्याय विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत राज्यात १७ लाख ८३ हजार १७५ ज्येष्ठ नागरिकांचे अर्ज प्राप्त झाले असून, या अर्जाची छाननी आणि आधार प्रमाणीकरणाचं काम सुरु आहे.

****

राज्यातल्या धान आणि भरडधान्य खरेदीत शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून राज्यस्तरावर डिस्ट्रेस सेल रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीत कुणी खरेदी करत असेल, तर हा सेल काम करणार असून, धान तसंच ज्वारी, बाजरी, मका, नाचणी याची खरेदी याअंतर्गत केली जाणार आहे.

****

राज्यात देवळाली ते दानापूर दरम्यान धावणाऱ्या पहिल्या विशेष रेल्वेगाडीचं केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्धाटन केलं. ह्या शेतकरी समृद्धी विशेष रेल्वेगाडीमुळं शेत ते ग्राहकांमधील संबंध वाढीस लागणार आहे. ही रेल्वे या प्रवासात एक हजार पाचशे किलोमीटरचा टप्पा पार करणार असून शेतकऱ्यांना शेतमाल पाठवण्यासाठी केवळ चार रुपये प्रतीकिलो प्रमाणे दर आकारला जाणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथं अश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमेनिमित्त लाखो भाविक पायी येत असतात. त्यामुळे आज आणि उद्या तुळजापूर मार्गावरील वाहतूक वळवण्यात आली आहे. यात छत्रपती संभाजीनगर वरून हैदराबाद, सोलापूरकडे येणारी वाहतूक बीड, लातूर, औसा, उमरगा अशी वळवण्यात आली आहे. तर सोलापूर कडून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतूक, बार्शी, येडशी मार्गे वळवण्यात आली आहे. सर्व ठिकाणी दिशादर्शक फलक  लावण्यात आलेले आहेत, पायी येणाऱ्या भाविकांनी रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावं, आणि हा उत्सव सुरक्षित पार पाडावा, असं आवाहन धाराशिवचे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी केलं आहे.

****

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी येत्या २९ तारखेपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी यासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात लोहा तालुक्यातल्या मारतळा इथं जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने जागतिक हात धुवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी गावात जनजागृतीपर कार्यक्रम राबवला. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या आवाहनानुसार विद्यार्थ्यांनी आठवडी बाजारात जाऊन हात धुण्याच्या योग्य पद्धतींबद्दल माहिती दिली.

****

नांदेड विभागात आजपासून येत्या २० तारखेपर्यंत धारुर ते रोटेगाव आणि परभणी ते पिंगली या स्थानकांदरम्यान लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे काही रेल्वे अंशतः रद्द तर काही रेल्वे उशिरा धावणार आहे. नगरसोल – रोटेगाव – नगरसोल ही रेल्वे गाडी आजपासून १९ ऑक्टोबर पर्यंत नगरसोल ते रोटेगाव स्थानकांदरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. तर अमृतसर – नांदेड ही रेल्वगाडी २१ ऑक्टोबर ते १३ डिसेंबर या कालवधीत औरंगाबाद ते परभणी या स्थानकांदरम्यान दोन तास उशिरानं धावणार आहे. काचीगुडा नगरसोल ही रेल्वगाडी १५ ऑक्टोबर ते १४ डिसेंबर या कालवधीत मुदखेड ते पुर्णा स्थानकादरम्यान एक तास उशिरानं तर परळी – अकोला ही रेल्वेगाडी १४ डिसेंबर या कालवधीत परळी ते परभणी स्थानकादरम्यान अर्धा तास उशिरानं धावेल. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड कार्यालयानं ही माहिती दिली आहे.

****

नैऋत्य मोसमी पावसानं काल संपूर्ण देशातून माघार घेतली, त्याचवेळी दक्षिण भारतात ईशान्य मान्सून सक्रीय झाला आहे.

****